Price Rs. 3/-

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे
ह्यांची गृहपत्रिका

वर्ष चौथे
अंक दहावा
नोव्हेंबर २००७
NOVEMBER 2007

# संवाद

## दिवाळी विशेषांक

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥



Visit us at : www.sbipensionerspune.org
E-mail : sbipenmumbai@yahoo.com

# संपादकीय

@प्रिय वाचकहो,

'संवाद'चा हा दिवाळी विशेषांक आपल्याला सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. दिवाळी अंक हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक महत्ता नि परंपरा जपण्याचे महत्त्वाचे कार्य दिवाळी अंक पार पाडीत आलेले आहेत. हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील कोणत्याही प्रदेशांतून वा भाषांतून प्रसिद्ध होत नसतील एवढ्या मोठ्या संख्येने केवळ महाराष्ट्रातून नि मराठी भाषेतून दरवर्षी दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. दिवाळी अंक मराठीचे भूषण आहे, महाराष्ट्राचे वैभव आहे असे आम्ही मानतो. दिवाळी अंक हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जणू अविभाज्य भाग बनलेले आहेत. म्हणूनच दिवाळीबरोबरच दिवाळी अंकांची प्रतीक्षा मराठी वाचक आतुरतेने करीत असतात.

आम्हाला जाणीव आहे की 'संवाद'चा हा दिवाळी अंक आपल्या हाती पडेल तेव्हा दिवाळी होऊन गेलेली असेल. दिवाळीच्या झगमगाटी वातावरणातून, फटाक्यांच्या कर्णकर्कश आवाजातून अन् विविध खाद्यपदार्थांच्या रुचकर फराळातून आपण एव्हाना बाहेर पडला असाल आणि आता आपला नित्याचा निवांत जीवनक्रम चालू झाला असेल. मात्र अनेक दिवाळी अंकांद्वारे आपण अजूनही विविध वाङ्मयीन साहित्य कृतींचा आस्वाद घेत असाल. 'संवाद'च्या या दिवाळी विशेषांकाच्या रूपाने आम्ही अनेक वाङ्मयीन खाद्यपदार्थांचं रुचकर ताट आपणापुढे ठेवीत आहोत. 'संवाद'ची पृष्ठसंख्येची मर्यादा पाळूनही आम्ही आपल्या मनाला भावेल, हृदयाला भिडेल आणि विचारांना चालना देईल असं कथा, कविता, विनोद, लेख, व्यंगचित्रे आदी साहित्यकृतींच्या रुपात वैचारिक वाङ्मयीन खाद्य देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. 'संवाद'च्या वाचनाने आमच्या वाचक मित्रांना लेखनाची प्रेरणा मिळत असते याचा आम्ही नेहमीच अनुभव घेत असतो. 'संवाद'चे बहुतेक लेखक नवोदित वा होतकरू आहेत. ते प्रथितयश साहित्यिक नाहीत ही वस्तुस्थिती असली तरीही त्यांच्याकडून उत्तम साहित्यगुण असलेल्या साहित्यकृतींची निर्मिती होते; कारण त्यांची लेखनाची ऊर्मी अनावर असते आणि त्यांचा उत्साह व प्रयत्न अत्यंत प्रामाणिक असतो. ह्या सत्याची साक्ष 'संवाद'चा प्रत्येक अंक देत आला आहे.

मागील संपादकीयात म्हटल्याप्रमाणे आमचे सर्व ज्येष्ठ सभासद हे प्रत्यक्ष आनंदरूपच आहेत. त्यामुळे ते आनंदाचे दूत बनून नव्या 'आनंद पर्वा'चे साक्षीदारच नव्हे तर साक्षात् आनंदवाहक शिल्पकार बनतील याविषयी आमची खात्री आहे. दिवाळीचे चारच दिवस नव्हेत तर वर्षाचे सर्व ३६५ दिवस या आनंदपर्वाचा सुखद अनुभव आपणा सर्वांच्या वाट्यास येवो ही प्रार्थना ! आपणा सर्वांना सुखाचे, समाधानाचे, समृद्धीचे, आनंदाचे नि आरोग्यसंपन्न प्रदीर्घ आयु लाभो ही 'संवाद'च्या वतीने आम्ही शुभेच्छा देतो आणि प्राचीन काळापासून रूढ असलेल्या आपल्या परंपरागत प्रार्थनेचा पुनरुच्चार करून आपला निरोप घेतो -

"सर्वेऽपि: सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया: ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ।।"

।। इति लेखनसीमा ।।

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**

## The Prayer in the Writ Petition No.1931 of 2002 filed in Delhi High Court is reproduced hereunder for information of Members

At the instance of Federation of S.B.I.Pensioners' Associations, our Delhi Circle Pensioners' Association supported 7 individuals to file a writ petition against Govt. of India, RBI and State Bank of India. Accordingly, Sm.Premavati Bagga & six others filed a writ No.1931 of 2002 in Delhi High Court on 8th March 2002. Out of 7 petitioners 4 individuals died, so far. The remaining 3 petitioners have written a letter to the Chief Justice, Supreme Court, New Delhi requesting him to decide the case before they die. We reproduce hereunder only the prayer made by the petitioners therein for the information of our members.

### Prayer

In view of the submissions made above (in the earlier pages of the writ petition) their Lordships of this Hon'ble Court may graciously be pleased to :

(a) Issue Writ of Certiorari or any other Writ, order or direction quashing the impugned letter dated 23/2/1999 issued by Respondent-1/Union of India in the Ministry of Finance, Department of Economic Affairs (Banking Division) which made the arbitrary division of Pensioners into two categories of 50% and 40%;

(b) Issue a Writ of Certiorarior any other Writ, order, or direction quashing the order dated 31/10/2000 issued by the Respondent-3/Bank creating an artificial division of Pension ceiling of 50% for Pension payment in the cases where the salary level is upto Rs.8500/- and 40% where it exceeds Rs.8500/-;

(c) Issue a Writ of Mandamus, any other Writ, order or direction to the Respondents to follow the established norm of Pension being 50% of salary level of the retired employee at the time of retirement and 30% of the salary level of the retired employee at the time of his retirement as Family pension for all Pensioners as a class;

(d) Issue a Writ of Mandamus , any other Writ or order or direction to the Respondents for recalculation of Pension based on 60 years of age w.e.f. 1/11/1993 even for pre-1/11/1993 Pensioners such as the Petitioners and to pay the arrears of pension due to the petitioners;

(e) Issue a Writ of Mandamus, or any other Writ, order or direction to the Respondents to revise and recalculate the Dearness Relief payable to Pensioners/Petitioners at the rate of 100% neutralisation and abolish the discriminatory categorisation effective since 1/11/1987 and to pay the arrears of the recalculated pension as admissible to them;

(f) issue a Writ of Mandamus or any other Writ, order or direction directing the Respondents 1,2 and 3 for a corresponding upward revision of Pension/Family Pension in tune with every revision in salary structure in future also, following the principles laid and the assurances given by the Respondent-3/Bank in the case of IMPERIAL BANK OF INDIA PENSIONERS ASSOCIATION 1989 SUPPL (1) SCC 236 (=JT 1989(1) SC 383);

(g) Grant the costs of the Petition in favour of the Petitioners and against the Respondents;

(h) Pass any other or further order as may be deemed fit and proper by this Hon'ble Court in the facts and circumstances of the case of the Petitioners and in the interest of justice.

Sd/-

New Delhi : 8/3/2002 — Advocates for the Petitioners

## SBI Reverse Mortgage Loan (RML) Scheme
### Salient Features

| | |
|---|---|
| **Objective** | To provide a source of additional income for **Senior Citizens** of India who own **self-acquired and self-occupied house property** in India. |
| **Purpose** | Supplementing income, any personal expenses, house repairs, etc. Loan amount should not be used for speculative, trading and business purposes. |
| **Eligibility** | |
| **a) No. of Borrowers** | * Single or jointly with spouse in case of living spouse |
| **b) Age of first borrower** | * Above 60 years (Age of spouse > 58 years) |
| **c) Residence** | * Borrower should be staying at self-acquired and self-owned house/flat against which loan is being raised, as his **Permanent primary residence.** |
| **d) Title of the property** | * Clear & transferable title, free from all encumbrances in the name of the borrower (Title verification & search report of **30 years** to be obtained from Bank's empanelled advocate at borrower's cost) |
| **e) Residual** | * 20 years in case of Single borrower & 25 years in case of spouse < 60 years. |
| **Tenor** | Age of the **younger** of the borrowers between 58 and upto 68 years : 15 years |
| | Age of the **younger** of the borrowers above 68 years : 10 years |
| | **Or** till death of the borrower(s), whichever is earlier. |
| **Quantum of Loan** | The loan amount would be 90% of the value of property. Loan amount would include interest till maturity. The loan instalments payable to the borrower(s) would be as under for a loan amount of Rs.1 lac (at interest rate of 10.75% p.a.) : |

| Loan Tenor(yrs) | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
|---|---|---|---|---|---|---|
| **Payments** | | | | | | |
| Monthly | 468 | 399 | 343 | 297 | 258 | 225 |
| Quarterly | 1,423 | 1,215 | 1,045 | 905 | 787 | 687 |
| Lumpsum | 36,022 | 32,525 | 29,368 | 26,517 | 23,944 | 21,619 |

| | |
|---|---|
| **Maximum Loan Amt.** | **Maximum :** Loan amount is proposed to be kept at **Rs.1 Crore** (monthly payment Rs.22,500/- for 15 years) and<br>**Minimum : Rs.3 lacs** (monthly payment Rs.675/- for 15 years)<br>Example of arriving at the monthly instalments :<br>Property value : Rs.10 lacs<br>Qualifying loan amount<br>(90% of property value) : Rs.9 lacs<br>Tenor .. .. .. : 15 years<br>monthly instalment : Rs.225 x 9 = Rs.2,025/- |
| **Interest** | **Public : 10.75% p.a.** (Fixed) subject to reset every 5 years.<br>**SBI Pensioners :** Concessional interest rate of 1% below the card rate applicable to public. |

| | |
|---|---|
| **Processing Fee (upfront)** | 0.50% of loan amount, Minimum Rs.500/-, Maximum Rs.10,000/- |
| **Security** | Equitable Mortgage of property. |
| **Type of Loan** | Non-renewable Overdraft without ledger folio charges. No cheque book/debit card will be linked to this account. |
| **Disbursement** | By credit to an SB account in the joint names of the borrowers operated by E or S |
| **Periodicity of availing loan Repayment** | 1. Monthly / quarterly payments<br>2. Lump sum payment<br>* The loan shall become due and payable only when the last surviving borrower dies or opts to sell the home. Or, permanently moves out of the home for to an institution or to relatives.<br>* Settlement of loan along with accumulated interest is to be met by the proceeds received out of sale of residential property or prepayment by borrowers and his next of kin.<br>* The borrower(s) or his/her/their legal heirs/estate shall be provided with the first right to settle the loan along with accumulated interest, without sale of property.<br>* A reasonable amount of time, say upto 6 months, may be provided when RML repayment is triggered, for house to be sold.<br>* The balance surplus (if any), remaining after settlement of the loan with accrued interest and expenses, shall be passed on to the borrower or the estate of the borrower/legal heirs. |
| **Foreclosure** | The loan shall be liable for foreclosure due to occurence of the following events of default :<br>* If the borrower(s) has/have not stayed in the property for a continuous period of one year<br>* If the borrower(s) fail(s) to pay property taxes or maintain and repair the residential property or fail(s) to keep the home insured, the Bank reserves the right to insist on repayment of loan by bringing the<br>* Residential property to sale and utilizing the sale proceeds to meet the outstanding balance of principal andinterest.<br>* If borrower(s) declare himself/herself/themselves bankrupt.<br>* If the residential property so mortgaged to the Bank is donated or abandoned by the borrower(s).<br>* If the borrower(s) effect changes in the residential property that affect the security of the loan for the lender. For example : renting out part or all the house by creating a tenancy right; adding a new owner to the house’s title; changing the house’s zoning classification; or creating further encumbrance on the property either by way of taking out new debt against the residential property or alienating the interest by way of a gift or will.<br>* Due to perpetration of fraud or misrepresentation by the borrower(s).<br>* If the government under statutory provisions seeks to acquire the residential property for public use.<br>* If the government condemns the residential property (for example, for health or safety reasons).<br>* Any other event such as re-marriage of the borrower(s) etc. which shall have an adverse impact on the loan settlement prospects. |

| | |
|---|---|
| ` | * Borrowers do not accept the revised terms on revaluation of property and interest reset at the end of every 5 years from sanction.<br>* Any violation of the terms and conditions of RML. |
| **Pre-Payment Penalty** | No prepayment penalty. The borrower(s) will have option to prepay the loan at any time during the loan tenor. |
| **Insurance & Maintenance** | a) The house property will be insured by the borrower at his cost against fire, earthquake and other calamities.<br>b) The borrower shall ensure to pay all taxes, charges etc.<br>c) Bank reservrs the right to pay insurance premium, taxes, charges etc. by reducing the loan amount to that extent.<br>d) The borrower shall maintain the property in good condition. |
| **Other features** | * No. of surviving spouses on the date of sanction of loan should not be more than one (Borrowers will have to give an undertaking that they will not remarry during the currency of the loan)<br>* Borrowers will be required to inform the Bank when they cease to use this residence as their permanent residence.<br>* If the title is in single name and loan availed jointly with spouse, title holder should make a Registered Will in favour of the other spouse. The Will should confirm that this is the last Will and that it supercedes all earlier Wills, if any. The borrower to undertake that no fresh Will shall be made during the currency of the loan.<br>* Borrowers will be required to submit annual life certificates in the month of November every year. This certificate will also include clauses regarding marital status, and permanent residence of the borrowers, in addition to the balance confirmation as on 31st October of that year.<br>* List of legal heirs will be obtained at the time of sanction of loan. With a view to avoiding disputes at the time of settlement of loan amount by legal heirs, specific instructions about inheritance of the property and payment of balance amount, if any, of the sale proceeds after settling the Bank's dues, will be required to be part of the borrower's Will. |

*स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन,*

## स्नेहमंडळ पुणे

### सुगम संगीत मैफल

एस.बी.आय.पेन्शनर्स स्नेहमंडळ पुणे यांचे तर्फे सोमवार दि. २२ ऑक्टोबर २००७ रोजी पुण्यातील भरत नाट्यमंदिर येथे सुप्रसिद्ध गायिका सौ.सुवर्णा माटेगावकर व श्री.राजेश दातार यांचा सुगम व चित्रपट गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सुरुवातीच्या सत्रात त्यांनी निवडक भावगीते, भक्तिगीते तसेच श्री.राजेश दातार यांचे बरोबर काही द्वंद्वगीते आपल्या सुरेल आवाजात सादर केली. श्री.दातार यांनी काही नाट्यगीते चांगल्या तयारीने गाऊन श्रोत्यांकडून 'वन्स मोअर' मिळवला. दुसऱ्या सत्रात त्यांनी जुन्या जमान्यातील काही लोकप्रिय हिंदी चित्रपट गीते गाऊन उपस्थित श्रोत्यांची वाहवा मिळवली.

श्री.सरदेशमुख यांनी गायक कलाकारांचे, व बहुसंख्येने उपस्थित असलेल्या स्नेहमंडळ सभासदांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

– सेक्रेटरी

## आदिवासी



वृक्ष माझे मैतरी, डोंगर माझे शेजारी
वारा माझा सोबती, निसर्ग माझा सांगाती ।।१।।

वस्त्र माझे तोकडे, पाटी पेनशी वाकडे
पशु पक्षी अन् माकडे, विकासाचे मला वावडे ।।२।।

जादूटोणा जंतरमंतर, नाचगाणी सुरापान
दोन वेळच्या घासांसाठी, रोजच माझे स्थित्यंतर ।।३।।

विकास योजना येती दारी, ताव मारिती एजंट भ्रष्टाचारी
कोटी कोटी खर्च झाले, हाती काहीच नाही पडले ।।४।।

– **सीताराम तेरवाडकर**
श्रीपाद अपार्टमेंट, फ्लॅट नं.३, सरस्वती नगर, सांगली

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा- पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, दादर, मुंबई

## EMPANNELMENT OF OFFICERS / EMPLOYEES RETIRED FROM BANK AS MARKETING CONSULTANTS

Bank has decided to engage the services of retired officers as **Marketing Consultants,** without prejudice to their pension. Retired employees of the **Clerical cadre** will also be engaged on **selective basis.**

The terms & conditions for such empanelment are as under :

- The engagement will be upto the age of 65 years maximum and will be on **Contract Basis.**
- The Contract will be for a period of 6 months subject to renewal depending upon satisfactory performance, suitability and requirement of the Bank.
- The required officers/employees will be working from their homes and will report to the Head of Bank's Marketing Teams or the Zonal/Regional/Branch Head.
- Fee will be paid at the rate of 0.25% of the loan amount with a cap of Rs.10,000/- per loan which is booked, sanctioned and disbursed. No other payment will be made to them in the form of salary/allowances/out of pocket expenses etc.
- Monthly target will be 5 loans per month with minimum 10 loans for two months.
- Marketing concultant shall not be permitted to use the Bank's name or logo on their signboards, nameplates, visiting cards, stationery etc. They shall not be entrusted with any financial/passing administrative powers and have no access to Bank's Computers, Core Banking Platform, Bank Master System etc.

**JOB PROFILE :** Obtain leads on Home loan requirements of individuals from various sources, meet intending borrowers at place and time convenient to them, explain Home Loan product details, Fill in loan application, obtain requisite documents, deliver these to the identified RACPC/Branch and follow up the application till sanction.

**TRAINING :** Candidates empanelled as Marketing Consultants will be trained on product de tails and marketing for 2 days.

Please submit your application in the prescribed format (Annexure I) and submit the same to our **nearest Zonal Office, IMMEDIATELY.**

(Annexure printed on next page)

### सेझ

***(श्री.अरविंद नलावडे, कोल्हापूर ज्यांनी मला लिहिण्याची प्रेरणा दिली त्या हरहुन्नरी कलावंतास सादर अर्पण)***



आले आले 'सेझ' आले, प्रगतिचे नवे गेज आले
आता विका धरणीमाय, दुसरा नाही तरणोपाय
लक्ष्मीचा फांस अडकला, बळी राजाचा बळी गेला
पैशाचे नवे तेज आले, आले आले सेझ आले

**- सिताराम अ. तेरवाडकर,** सांगली

**All the Members are requested to furnish "Life Certificate" to their respective Pension-paying Branch immediately, if not furnished so far.**

**********

ज्या सभासदांनी नोव्हेंबर २००७ या महिन्यात ज्या ब्रँचमधून पेन्शन घेतो त्या ब्रँचमध्ये जाऊन 'हयातीचा दाखला' दिला नसेल त्यांनी त्वरित द्यावा ही विनंती.

Annexure - A

## APPLICATION FORMAT

To,
The Dy. General Manager,
State Bank of India,
Zonal Office,
______________

Sir,

**APPLICATION FOR EMPANELMENT OF OFFICERS/EMPLOYEES RETIRED FROM THE BANK, AS MARKETING CONSULTANT IN STATE BANK OF INDIA**

I submit herewith my application for the post of Marketing Consultant in State Bank of India. I have read the Role, Remuneration and Terms & Conditions relating to the post and advise that they are acceptable to me.

1. Full Name Shri/Smt/Kum (in Block Letters, as per degree certificate)

2. Father's / Husband's Name

3. P.F.Index No.

4. Date of Retirement (DD/MM/YYYY)

5. Name and Code No. of Branch / Office from where retired :

6. Name and Code No. of Branch where from receiving pension :

7. Candidates address where he/she normally resides / will reside where from he/she will perform his/her duties after selection. ( IN BLOCK LETTERS)

Dist______

State______

Pin Code____

Phone with STD______

Mobile No.______

8. Date of Birth (DD/MM/YYYY) :

Age* (as on ____________ ) Years Months

* should not be more than 64 years as on the stipulated date.

9. Category (SC/ST/OBC/GEN) :

10. Educational Qualification :

(contd. on next page)

(2)

11. Last three Assignments held covering minimum 5 years :

| ASSIGNMENT | FROM | TO | OFFICE/BRANCH |
|---|---|---|---|
| i) | | | |
| ii) | | | |
| iii) | | | |

12. Languages Known
(Mark "[ ]" in the appropriate box)

| Language | Read | Write | Speak | Understand |
|---|---|---|---|---|
| a)________________________________ | [ ] | [ ] | [ ] | [ ] |
| b)________________________________ | [ ] | [ ] | [ ] | [ ] |
| c)________________________________ | [ ] | [ ] | [ ] | [ ] |

13. Declaration

I hereby declare that

i) I retired from the Bank's service on attaining superannuation and not under Voluntary Retirement Scheme or Exit Option Scheme.

ii) No punishment / penalty was inflicted on me during five years of my service in the Bank preceeding my retirement.

iii) No case of CBI or any other Law Enforcement Agency is pending against me and

iv) I am physically fit to carry out duties of the Marketing Consultant including continuous travel.

I further declare that all statement made in this application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. i understand that in the event of any information being found untrue or incorrect at any stahe of my not satisfying any of the eligibility criteria according to State Bank of India, my candidature is liable to be cancelled.

Place :______________________ Signature______________________________

Date : ______________________ Name of Candidate :______________________

Signature of Shri/Smt. ________________________________ verified

(Signature & Seal of the BM of the pension disbursing branch)

## J मूर्खपणा

शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीने एका खेड्याला भेट दिली. तिथे सर्वच मिरचीचे पीक घेतले जात होते. झाडावर लगडलेल्या हिरव्यागार मिरच्या आणि बाजूलाच वाळत घातलेल्या लाल मिरच्या पाहून समितीच्या अध्यक्षांनी विचारले, 'हिरव्या मिरचीचा भाव काय पडतो ?'



'सहा-सात रुपये'

'आणि लाल मिरचीचा ?'

'पंचवीस तीस रुपये'

'काय हा मूर्खपणा ! मग लाल मिरच्यांऐवजी तुम्ही हिरव्या कां लावता ?' अध्यक्षांनी विचारले.

## J जीवदान

**धनाजी :** ही समोरुन येणारी मुलगी आहे ना, तिचा जीव एकदा मी वाचवला.



**संताजी :** तो कसा काय बुवा ?

**धनाजी :** एकदा मी तिला लग्नाची मागणी घातली, तेव्हां ती म्हणाली, 'तुझ्याशी लग्न करण्यापेक्षा मी विहिरीत उडी मारून जीव देईन' मी तिच्याशी लग्न करण्याचा विचार सोडून दिला.

## आश्वासन

**मंत्री :** बंधूंनो, या गावात आम्ही पूल बांधून देणार आहोत.

**गावकरी :** पण गावात नदीच नाही.

**मंत्री :** असं ? मग रोजगार हमी योजनेत नदी खोदून देऊ.

— पी. के. देवधर, पुणे

## On Friendship

(contributed by Shri.K.Govindan, Dy.M.D.,SBI (Retd.))
*Courtesy - SBI Elders Voice, (Sept. 2007 issue)*

The other day a young person asked me how I felt about being old. I was taken aback, for I do not think of myself as old. Upon seeing my reaction, she was immediately embarrassed, but I explained that it was an interesting question, and I would ponder over it and let her know.

old Age, I decided, is a gift. I am now, probably for the first time in my life, the person I have always wanted to be. Oh, not my body! i sometime despair over my body, the wrinkles, the baggy eyes and the sagging bitt. And often I am taken aback by that old person that lives in my mirror (who looks like my mother!), but I don't agonize over those things for long.

I would never trade my amazing friends, my wonderful life, my loving family for less grey hair or a flatter belly. As I've aged, I've become more kind to myself and less critical of myself. I have become my own friend. I don't chide myself for eating that extra cookie,or for not making my bed, or for buying that silly cement gecko that I didn't need, but looks so avant garde on my patio.

I am entitled to a treat, to be messy, to be extravagant. i have seen too many dear friends leave this world too soon; before they understood the great freedom that comes with aging.

Whose business is it if I choose to read or play on computer until 4 a.m. and sleep untill noon?

I will dance with myself to those wonderful tunes of the 60 & 70's and if I, at the same time, wish to seep over a lost love... I will.

I will walk the beach in a swim suit that is stretched over a bulging body and will dive into the waves with abandon if I choose to, despite the pitying glances from the jet set. They, too, will get old.

I know I am sometimes forgetful. But there again, some of life is just as well forgotten. And I eventfully remember the important things.

Sure, over the years my heart has been broken. How can your heart not break when you lose a loved one, or when a child suffers, or even when somebody's beloved pet gets hit by a car? But broken hearts are what give us strength and understanding and compassion. A heart never broken is pristine and sterile and will never know the joy of being imperfect.

I am so blessed to have lived long enough to have my hair turning gray and to have my youthful laughs be forever etched into deep grooves on my face. So many have never laughed and so many have died before their hair could turn silver.

As you get older, it is easier to be positive. You care less about what other people think.

I don't question myself anymore. I've even earned the right to be wrong.

So, to answer your question, I like being old. It has set me free. I like the person I have become. I am not going to live forever, but while I am still here. I will not waste time lamenting what could have been, or worrying about what will be. And I shall eat dessert every single day. (If I feel like it !!)

**MAY YOU ALWAYS HAVE A RAINBOW OF SMILES ON YOUR FACE AND IN YOUR HEART FOREVER AND EVER!**

**Writ Petition 1931 of 2002 in Delhi High Court**

The case again adjourned for next hearing on 15th November 2007.

**दिल्ली हायकोर्ट केस - रिट पिटिशन नं.१९३१/२००२**

सदरहू केसची सुनावणी पुन्हा स्थगित होऊन पुढील सुनावणीची तारीख १५ नोव्हेंबर २००७ आहे.

विनोदी कथा

# छत्री आणि प्रेम



त्यावेळी मी नुकताच विद्यापीठाच्या गिरणीमधून पदवी घेऊन बाहेर पडलो होतो. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याने बँकांनी शाखा विस्तार सुरू केला होता, म्हणून एका राष्ट्रीयीकृत बँकेत कॅशियर म्हणून चिकटलो. हातात नोकरी व खिशात पैसा असल्याने उपवर मुलींचे पिताश्री आमच्या घराचे उंबरठे झिजवू लागले होते. पण मला त्या काळातील सिनेमांच्या प्रभावाने अशा पद्धतीने लग्न करणे मंजूर नव्हते. प्यार, मोहब्बत, इश्क अशा शब्दांनी मला झपाटले होते. त्या दृष्टीने मी माझ्या पिताश्रींना स्पष्ट सांगितले ''हम हमारी वधु- को खुद ढूँढेंगे ! आप खालीपिली समय खराब मत करो !''

दिलीप, देव, राज ह्या त्रिकुटाकडून व नंतर आलेल्या शम्मी कपूर कडून आम्ही प्रेमाचे धडे पुरेपूर गिरविले होते. फक्त कमी कशाची होती तर आम्हाला हीरो समजणाऱ्या हिरॉइनची. अनेक तरुणींना न्याहाळून आम्ही नूतन, नर्गिस, वैजयंती यांचा शोध घेत होतो, पण अजून कोठेही लग्गा लागत नव्हता.

वैशाख सरला आणि ज्येष्ठही सरला, तरी हरकत नाही आता निदान येणाऱ्या आषाढ-श्रावण सरीत आपण प्रेमात भिजून जाऊ, असे ठरविले. प्रेम जमण्यासाठी पावसासारखा सीझन नाही. सर्व ओलेत्या नायक-नायिका डोळ्यासमोर फिरू लागल्या. एकाच छत्रीत, भर पावसात अर्धवट भिजत एकमेकांना चिकटत चालण्याची स्वप्ने पडू लागली. पाऊस सुरू झाल्याबरोबर अगोदर एक नवी छत्री विकत आणली. बसस्टॉपभोवती रेंगाळू लागलो. कुणीतरी मदतीच्या अपेक्षेने छत्रीत येईल म्हणून तरुणींच्या घोळक्याभोवती घोटाळू लागलो.

एकदा एका बस स्टॉपवर रांगेत उभे असताना एका चौकस गृहस्थाला संशय आला. कारण बस थांबली तेव्हा मी पुढे न सरकता मागे रांगेत बघत होतो.

''काहो, जायचे नाही तर कशाला रांगेत थांबलात ?''

''मी जरा वाट बघतोय.''

''कुणाची ? बस तर थांबली आहे.''

''तुम्हाला काय करायचे आहे ?''

''चला व्हा बाजूला आणि बघत बसा वाट.'' असे म्हणून तो गृहस्थ आणि आणखी एक-दोन जण बसमध्ये चढले व बस निघून गेली.

एका सिनेमातलं एक रोमँटिक दृष्य माझ्या डोक्यात फिट्ट बसले होते. नायक बस स्टॉपवर बसची वाट पहात आहे, शेजारी नायिका येऊन उभी रहाते. तेवढ्यात पाऊस सुरू होतो, नायक त्वरेने छत्री उघडून नायिकेवर धरतो व स्वत: थोडे भिजतो. हा त्याचा त्याग बघून नायिका मंदसे स्मित करते व त्यास एका छत्रीत जमेल तेवढी जवळ येते आणि बस. मग काय प्यार ! प्यार ! प्यार !

प्यार हुआ इकरार हुआ
जमानेसे फिर क्यूँ डरता हैं दिल
आजा साजन, आकर मिल ।।

पावसाळ्यातले दोन महिने मी छत्री घेऊन शहरातील अनेक बस स्टॉप माझ्या प्रयोगासाठी निवडले. कुठेही माझी नायिका दृष्टीस पडत नव्हती आणि ज्या नायिका वाटत होत्या त्यांच्या छत्र्या त्यांच्या छोट्या पिशवीत व पर्समध्ये सुरक्षित होत्या.

एकदा मी उलटा प्रयोग करून पाहिला. काही दिवस मी बिनाछत्रीने फिरलो. पण मी भरपूर भिजत असताना सुद्धा एकही सुकन्या माझ्या मदतीला आली नाही आणि मला तिच्या छत्रीत घेतले नाही. काही वेळा काही नायिकांजवळ छत्री नसायची पण त्यांचा नवरा नामक नायक आसपासच घुटमळत असे. काही वेळा नायिकेजवळ छत्रीही नसायची व नवराही नसायचा. पण मग अशावेळी पाऊसही नसायचा.

एकदा मात्र एक सुंदरी जवळ आली. विशेष म्हणजे पाऊसही हजर होता. मी लगेच पुढे झालो तिने माझ्या मदतीचा झटकन् हसून स्वीकार केला. छत्री हातात घेतली आणि क्षणार्धात चालत्या बसमध्ये छत्रीसह आत सटकली. मी बावळटसारखा पहात राहिलो. स्टॉपवर शिल्लक असलेल्या लोकांपैकी काही कुचेष्टेने हसले. मी सोयीस्करपणे तिकडे दुर्लक्ष केले.

हम तडपते रह गये, वो मुस्कुराके चल दिये ।

श्रावणातील रिमझिम सुरू होती. पण आमच्या प्रेमाची रिमझिम काही सुरू होत नव्हती. त्या दिवशी कॅश जास्त असल्याने बँकेत थोडा उशीर होत होता. तोच घरून पिताश्रींचा फोन आला की येताना 'श्री मेडिकल्स'मधून तुझ्या आईसाठी 'अडुळसा' व ते देतील त्या गोळ्या घेऊन ये. त्यांना माझे नाव सांग, म्हणजे ते तुला ओळखतील. मी त्या स्टोअर्समध्ये गेलो व मालकांना वडिलांचा निरोप सांगितला. त्याप्रमाणे त्यांनी औषधे दिली. मी ती सर्व बॅगेत टाकली, स्टोअर्सच्या पायऱ्या उतरलो. पाऊस सुरूच होता, तोच एक विशीतील सुकोमल तरुणी खाली उतरली व मला अनपेक्षितपणे म्हणाली,

''अहो मला जरा मदत आणि सोबत करा. मी आता छत्री आणायला विसरले !''

मला क्षणभर काय बोलावे ते कळलेच नाही. भानावर आलो तेव्हा ती छत्रीत शिरलीसुद्धा होती व छत्रीचा दांडा तिने अर्धवट स्वत:कडे

झुकविला होता. दोघंही सारखेच अर्धवट भिजत निघालो. मला काय बोलावे तेच कळत नव्हते, ती सारखी बोलत होती. माझ्या अंगावर रोमांच की काय म्हणतात ते उठत होते. ती हळू हळूच चालत होती. माझी चौकशी करीत होती. मी हं, हो, होका यापलीकडे काही बोलत नव्हतो. बोलता बोलता आम्ही माझ्या घराजवळ आलो. तेव्हा तिला मी विचारले, ''आपल्याला कोठे जायचे आहे ?'' ती म्हणाली, ''येथेच.''

''अहो, हे तर माझे घर आहे.'' ती आत शिरता शिरता म्हणाली, ''आता हे घर माझेही होणार आहे.''

घरात आमच्या स्वागताला बरीच मंडळी वाट बघत होती. पिताश्रींनी त्यांचा डाव टाकला व आमचाही हट्ट पूर्ण केला आणि एकदाची आमची नायिका आम्ही पावसात मिळविली !

**- वसंत धुपकर,**

**बी -१० ऑरनेट पार्क, शिवतीर्थ नगर, पौड रोड, पुणे- ४११०३८, दूरध्वनी : (०२०) २५३९४४७२**

## श्री.पालकर व सौ.वहिनी

(आपल्या असोसिएशनच्या सोलापूर येथे पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत श्री.मधुकरराव तथा आण्णा पालकर यांना **''पाबळकर सुवर्णपदक''** देऊन गौरविण्यात आले. या सत्कारमूर्ती विषयीच्या भावना पुढील काव्यपंक्तीतून समर्पकपणे व्यक्त झाल्या आहेत. श्री.भालचंद्र अदवंत व सौ.सुलोचना अदवंत यांनी जणू सर्वांच्याच भावनांना शब्दरुप दिले आहे - संपादक)



प्रेमाशिवाय सत्कार्य नव्हे,
सत्कार्याला तर सद्गुण हवे,
सद्गुणाला स्वास्थ्य हवे,
स्वास्थ्यासाठी तर आरोग्य हवे ।।
आरोग्यासह सुंदर जीवन,
ते दीर्घ हवे, प्रसन्न पण हवे,
त्यांच्या संगती उजळतील ज्ञानदिवे ।।
ऐसे षड् ऐश्वर्य तुम्हाला मिळावे,
हीच 'तुळजाभवानी' आणि
'रेणुका' मातेजवळ आमची प्रार्थना ! ।।

**- भालचंद्र अदवंत,**
**सौ.सुलोचना अदवंत, धनकवडी, पुणे.**

## ।। मरावे परी नेत्ररुपी उरावे ।।

**नेत्रदान करून अंधांचे जीवन प्रकाशमय करा.**

## स्वगत-एकाकी शिणलेल्या वृद्धाचं

(आधार-नटसम्राट मधील गाजलेल्या स्वगताचा)



कुणी प्रेम देता का प्रेम ?
या एकाकी शिणलेल्या जिवाला
कुणी प्रेम देता का प्रेम ?
नात्याच्या माणसावाचून मायेच्या हातावाचून
हा जीव एकाकी जगतोय,
आधाराचा हात जवळपास शोधतोय,
वत्सल हाताचा स्पर्श मागतोय,
कुणी देता का त्याला
थरथरत्या मायेचा पाठीवर आश्वासक हात ?
खरंच सांगतो गड्यांनो !
हा जीव अगदी पोरका झालाय,
संसाराचा गाडा ओढून हाकून
संकटाशी लढता लढता
पुरता आता पिचून गेलाय.
जबाबदाऱ्यांचे ओझं खांद्यावर पेलत,
रक्ताची नाती अलगद जपत,
पिलांची जपणूक काळजीनं करत,
जीवातला जीवच आता क्षीण झालाय.
शुष्क हाता पायाची वाळकी लाकडं
कशी बशी जीव खाऊन
ओढत ढकलत थांबत कण्हत
जीव आता फरफटत दिवस मोजतोय.
खरंच सांगतो मित्रांनो !
या जिवाला आता एकटेपणाच
मरणाच्या यातना देतंय
या दु:खात कुणी जिव्हाळ्याचे
चार गोड शब्द देता का ?
लटपटणाऱ्या हाता पायांना
मुलांची काठी टेकायला देता का ?
उन्हात पोळणाऱ्या या जीवाला
बायकोची नव्हे, आईची सावली देता का ?
आता खायला गोड धोड नको,
पराची गादी झोपायला नको,
फक्त शेवटच्या श्वासापर्यंत
प्रेमानं गोड बोलणारं माणूस हवे
आणि विसरू नका बाबांनो !
शेवटी मस्तक मांडीवर घ्यायला, आई सारखी बायको हवी !

**- आर.जी.कडवेकर,** सातारा

ललित लेख

# पाऊलवाट

**संसार** वेलीवर कळी उमलते आणि घर आनंदून जातं. प्रगतीचा एकेक टप्पा गाठत ते मोठं होतं. कशाला तरी धरून चालायला लागतं. एका बेसावध क्षणी कसलाही आधार न घेता ते मूल सुट्टं उभं राहतं. काहीतरी वेगळं घडल्याचा भाव त्या अजाणत्या वयातही विस्मयचकित मुद्रेवर विस्फारलेल्या डोळ्यातून व तोल सांभाळण्यासाठी विशिष्ट 'पोझ' घेतलेल्या हातातून व्यक्त होतो. तो 'क्षण' आपणही टाळ्या वाजवून साजरा करतो. इतकंच नाही तर 'बाळ उभं राहिलं, आम्ही नाही पाहिलं' असं म्हणत त्याला प्रोत्साहन देतो. ते बाळसुद्धा आम्ही त्याच्याकडे बघावं म्हणून पुन्हा पुन्हा उठून उभं राहतं. त्याचा त्याला चाळाच लागतो. आमचं एवढ्यावर समाधान होत नाही, बाळाने पावलं टाकावी म्हणून 'चाल चाल मोते, पायी मोडले काटे' ह्याची चांगली 'एल.पी.' लावतो. त्याच्या चिमुकल्या पायात घुंगराचे वाळे घालतो. रंगीबेरंगी खेळण्याचं, खाऊचं आमिष दाखवतो, जेणे करून बाळाने पावलं टाकावीत. बाळ पडतं, रडतं, तरी पुन्हा उठून उभं रहातं आणि हळूहळू चालू लागतं. घरभर धावू लागतं कारण आता त्याला 'पाय फुटलेले' असतात.

ही पावले मग चालतच रहातात. आपल्या देहाचा भार सांभाळत इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरत रहातात. चार भिंतींच्या बाहेर पडून जे जे दिसेल ते बघण्यासाठी, जिथं जिथं जावसं वाटेल तिथे जाण्सासाठी, जे जे करावंसं वाटेल ते करण्यासाठी पाय आपली आयुष्यभर सोबत करतात. सकाळी उठल्याबरोबर 'पादस्पर्श क्षमस्व मे' अशी भूमातेची प्रार्थना करतच आपण उभे राहतो.

वारा नेईल तशी दिशा बदलणारी काही पावले असतात तर काही ठरवूनच वेगळी वाट चोखाळतात. यातलीच काही पावलं मॅरेथॉनच्या दिशेने कूच करतात. 'पी. टी. उषा' होण्याचं स्वप्न उराशी बाळगतात, आणि योग्य रीतीने पावलं उचलतात. काही डोंगरदऱ्या चढून जाण्याचा साहसी मार्ग निवडतात. प्रस्तरारोहण करतात तर काही हिमालयाच्या प्रेमात पडून त्याच्या भेटीला जातात. अन्यायाने पेटून उठणारी पावले संघटित होतात. एकत्रितपणे लढा देण्यासाठी पदयात्रा काढतात. पायात चाकांचे बूट घालून स्केटिंगच्या खेळाचा मनमुराद आनंद लुटणारे काही कमी नसतात. काहींच्या पायाला तर अक्षरश: भिंगरी लागलेली असते. 'आज इथे तर उद्या तिथे' अशी त्यांची स्थिती. मनात काही उद्दिष्ट, ध्येय ठरवून त्या दिशेने त्यांची वाटचाल अखंड चालू असते. मस्त भटकंती करणारे विमुक्त भटके निसर्ग सौंदर्याने वेडे झालेले असतात. 'चाळ माझ्या पायात, पाय माझे तालात' असं गुणगुणत काही पावले नृत्याविष्कार घडवतात. देशप्रेमाने भारावून गेलेली पावले 'पायदळात' दाखल होतात. कडक शिस्तीचे, नियमांचे पालन करत सीमारेषांचे संरक्षण करतात. फॅशन शोमध्ये 'कॅटवॉक' कसं असावं हे पावलं दाखवून देतात. 'उसके पाँव भारी हैं' हे स्त्रीच्या चालण्यावरूनच कळतं. सगळ्यांची पावले नेहमी योग्य दिशेने पडतात असं थोडंच आहे? व्यसनी, मद्यप्राशन केलेल्या व्यक्तींची पावले लडखडतात. 'ता' वरून ताकभात ओळखावा त्याप्रमाणे पावलांवरून व्यक्तिमत्त्वाची पारख होते. म्हणून चित्रपटाच्या पडद्यावर कधी कधी नुसतीच पावले दाखवली जातात.

समाजाच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या, हालअपेष्टा सहन करणाऱ्या संत महात्म्यांची पावले पूजनीय ठरतात. आपण तिथे नतमस्तक होतो. त्या पावलांवर डोकं ठेऊन आपण निर्धास्त होतो. मनाला वेगळीच शक्ती प्राप्त होते. त्या पावलांचे तीर्थ जीवनाला संजीवनी देते. 'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' हे तर सर्वश्रुत आहे. अशा थोर व्यक्तींचे पाय घराला लागले, त्यांची पायधूळ मस्तकी लागली तर आपण धन्य होतो. पांडुरंगाच्या भेटीची आस लागलेली, भक्तिरसात रंगलेली, 'पाऊल भजनात' न्हालेली वारकऱ्यांची पावले तर स्थळ काळाचे भानही विसरतात.

गतकाळात डोकावून पाहिलं तर आपल्या पद स्पर्शाने अहिल्या शिळेचा उद्धार करून पाषाणालाही 'जीवन' देणारी प्रभु रामचंद्रांची पाउले बघून आपला माथा अवनत झाल्याशिवाय रहात नाही. आपल्याला मिळालेले राज्य लाथाडून रामाच्या 'पादुका' सिंहासनावर ठेऊन राज्यकारभार करणाऱ्या भरताचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर आहे. संपूर्ण पृथ्वी प्रदक्षिणा करण्याऐवजी आपल्या बुद्धी चातुर्याने मातापित्यांना प्रदक्षिणा घालून कमीत कमी पावले चालून पुण्य प्राप्त करून घेणारा गजानन आपल्याला वंदनीय आहे. कृष्णाला भेटायला आलेला दुर्योधन उशाशी बसला तर अर्जुन पायाशी बसला, कृष्णाने डोळे उघडताच त्याचे लक्ष पावलापाशी बसणाऱ्या अर्जुनाकडेच आधी जाते.

आपल्या जीवनातही ह्या पावलांचा आपण अनेक वेळा सन्मान करतो. लग्नात सप्तपदीचं महत्त्व आहे. विवाहानंतर गृहप्रवेश करताना विवाहित स्त्रीच्या पावलांना लक्ष्मीची पावले मानून धान्याच्या मापाला पाय लावून ओलांडण्याचा विधी असतो. विहिणीचा मान म्हणून लग्नात पाय धुतो. गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीची मूर्ती घेऊन येणाऱ्याच्या पायावर दूध-पाणी घालण्याची प्रथा आहे. बोडण कालवायला येणाऱ्या सुवासिनींचे व कुमारिकेचे पायही दूध-पाणी घालून धुतले जातात. शक्यतो आपण कोणालाही पाय लावत नाही आणि चुकून लागला तर चटकन् नमस्कार करतो. गोपद्म तर देवासमोरील रांगोळीत मानाचे स्थान पटकावून आहेत. जंगलातील प्राण्यांच्या पावलांच्या ठशांना 'जंगलभाषेचा' दर्जा दिला जातो. कर्तृत्ववान व्यक्तींच्या पाऊलखुणा दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात.

पावलोपावली जाणीवपूर्वक ह्या 'पावलांना' महत्त्व देणं, त्यांची काळजी घेणं, त्यांच्यामुळेच आपण पायावर उभे आहोत ही वस्तुस्थिती मान्य करायलाच हवी. म्हणूनच या पायांचे पर्यायाने पावलांचे कौतुक केले जाते. पंचधातुचे वाळे, छुमछुम, तोरड्या, चांदीचे जाड वाळे घालून नादमयतेबरोबरच 'लक्षवेधी' बनवतो.

मेंदीच्या आकर्षक डिझाइनने त्यांचं सौंदर्य खुलवतो. नेलपॉलिशच्या विविधरंगी छटांनी आकर्षक करतो. थकल्या भागल्या पावलांना 'आज माझे पाय बोलताहेत' असं म्हणत गरम पाण्याचा ऊबदार सहवास देतो. अमृतमलम, कैलास जीवनने कुरवाळतो. त्यांना दुखू नये, खुपू नये म्हणून पायमोज्यात बंदिस्त करतो. ब्युटी पार्लरमध्ये तर खास पेडिक्युअरची सेवा असते. चप्पलबुटांची इंडस्ट्री तर त्यांच्या सेवेसाठी एका पायावर तयार आहे. दारातील 'पाय पुसणं' त्यांच्या स्पर्शाचं सुख अनुभवत गुपचूप दारात पडून रहातं.

कोणत्याही इमारतीचा पाया भक्कम असावा लागतो. त्याचप्रमाणे शरीराच्या इमारतीचे पाय मजबूत असावे लागतात. आर्थिक स्थैर्य प्राप्त होताच 'तो स्वत:च्या पायावर उभा राहिला' असं म्हणण्याची प्रथा पडली. एखाद्या व्यक्तीची योग्य जागा दाखवताना 'पायातील वहाण पायातच बरी' असा उल्लेख होतो. दोन गोष्टी एकात एक गुंतायला लागल्या की 'पायात पाय घालू नकोस' असा इशारा दिला जातो. आवाज न करता वावरणारी 'चोरपावलं' ठरू लागली. बेताल वागण्याचा उद्धार 'कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहिला नाही' अशा शब्दात होऊ लागला. एखाद्याचा चांगला आदर्श डोळ्यापुढे ठेऊन चालणाऱ्याची 'त्याच्या पावलावर पाऊल ठेवत चालला आहे' अशी स्तुती होऊ लागली. 'पायाला धूळ लागू नये म्हणून जपतोस तसे मनालाही जप हो' हे 'श्यामच्या आईचे उद्‌गार मन:पटलावर कोरले जाऊ लागले. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' ह्याचं प्रत्यंतर येऊ लागलं. मुलगा मोठा झाला हे वडिलांची चप्पल त्याला बरोबर येऊ लागली, असं बोलून दाखवून दिलं जाऊ लागलं. पुढं जाण्यासाठी पाऊलवाट मार्गदर्शक ठरू लागली. मातेच्या उदरातून बाहेर पडताना डोक्याऐवजी पाय पुढे येतात आणि जन्मभर 'पायाळू' म्हणून मिरवतात. एखाद्या गोष्टीतून 'काढता पाय घेणं' सोपं नाही, एकमेकांचे 'पाय ओढणं' हा मानवी स्वभाव आहे, त्यामुळे कोणाच्या 'पायाखालची वाळू कधी सरकेल' सांगता येत नाही, अशा रीतीने मराठी भाषेचं सौंदर्य वाढवण्यात पायाने चांगलाच 'पाय' रोवला आहे.

अनेक गीतातूनही हे पाऊल डोकावत रहातं. 'उंबरठ्यावर माप ठेविले, मी पायाने उलथुन आले' 'पाऊले चालती पंढरीची वाट' 'पाऊले घुटमळती दारात' 'भाग्य उजळले तुझे चरण पाहिले' 'कधी मी पाहीन ती पाऊले' 'चरणी तुझिया मज देई वास हरी' 'तुझी चरणसेवा पांडुरंगा' पावलोपावली किती आठवावी तेव्हढी थोडीच.

या दोन पायांवर चालताना त्यांची किंमत कळत नाही. पण दुर्दैवाने एखाद्याच्या पायातली शक्ती गेली किंवा अपघातात पाय गमवावे लागले तर जन्मभराचं परावलंबित्व नशिबी येतं. वेदकाळात विष्पला नावाच्या स्त्रीने युद्धात तिचा पाय गेला तर तिने लोखंडी पाऊल बसवून युद्ध केले. सुधाचंद्रन यांनी कृत्रिम पाय बसवून नृत्यसाधना केली. आजच्या काळात जयपूर फूट बसवला जातो. त्याचे मूळ वेदकाळात सापडते. सगळ्यांनाच कृत्रिम पाय बसवणे शक्य होतेच असे नाही. गाडीची चाके पायाचा 'रोल' करतात. एकूण काय तर पावलांना पर्याय नाही.

**- सौ.सुचित्रा साठे**, ठाणे.

ई-१ पूर्वा सोसायटी, पाच पाखाडी, ठाणे पश्चिम ४००६०२

## घर



घर स्वच्छ सुंदर असावं
बघताना मन प्रसन्न व्हावं ।



आरोग्य संपन्न, घर असावं
निरामय आरोग्य इथे नांदावं ।
नंदादीप प्रेमाचा, तेवतांना दिसावा
सौजन्याचा सुगंध दरवळत असावा ।
घरानं संस्कारांवर चिंतन करावं
नैतिकतेवर इथे, विचारमंथन व्हावं ।



घरात शांततेला सन्मान मिळावा
ध्वज सेवेचा घरावरी फडकावा ।
पाहुण्यांच्या स्वागताला घरानं हसावं
'आतिथ्य' घराचं वैभव असावं ।
त्याग, समर्पणाची भावना असावी
'स्वयंशिस्ती'ला घरात प्रतिष्ठा मिळावी ।
'स्वावलंबना'चा इथे सत्कार व्हावा
श्रमाला प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळावा ।
घरानं कर्तव्यपालनाचा मंत्र जपावा
आज्ञा पाळताना 'श्रीराम' स्मरावा ।
घरात प्रत्येकाला 'मत' असावं
निर्णयात घराचं 'एकमत' असावं ।



अंगणात रंगीत फुलांनी फुलावं
आनंदी मुलांनी त्यांच्याशी खेळावं ।



आपुलकीचा 'परिसस्पर्श' घराला व्हावा
प्रेम, जिव्हाळा, द्विगुणीत व्हावा ।
घराच्या सुपुत्रानं 'प्रशांत महासागर' व्हावं
भान किनाऱ्याचं ठेऊन, नांव सार्थ करावं ।
घराची सुकन्या 'सरिता' असावी
सासर-माहेरची वाट, तिने प्रीतीने जोडावी ।
घराच्या अंतरंगात 'चैतन्य' खेळावं
नाव घराचं 'सौजन्य' असावं ।



घराची स्वामिनी 'स्मिता' असावी
तिने घराची 'अस्मिता' जपावी ।
पित्यानं घराचा 'वटवृक्ष' व्हावं
त्याच्या छायेत कुटुंब सुरक्षित असावं
घराचं प्रवेश-द्वार प्रेमानं उघडावं
स्वर्ग, वैकुंठाला इथे समाधान लाभावं ।

**- पी.बी.भेंडे**, पुसद

विनोदी कथा J J J J J

# पोकळी

नाना नवले म्हणजे बँकेतील एक अजब व्यक्तिमत्त्व. त्यांच्या नाना कळा, किस्से, वागण्याच्या विविध छटा म्हणजे त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या आम्हां सर्वांना विनोदाची, हास्याची एक पर्वणीच असे.

**गेल्या** ५०/६० वर्षांच्या अनुभवावरून एक गोष्ट माझ्या ध्यानात आली आहे. कदाचित तुमच्याही ती ध्यानात आली असेल ती ही की, कोणत्याही क्षेत्रातील सर्वसामान्य व्यक्ती मृत झाली की, तिला श्रद्धांजली वाहताना समाजातील नामवंत त्या मृत व्यक्तीविषयी एक प्रतिक्रिया नक्की व्यक्त करतात. ती म्हणजे - ---- चे निधनाने राजकीय /सामाजिक/व्यावसायिक/ शैक्षणिक/साहित्यिक/नाट्यचित्रपट इ. इ. क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली आहे. ती कदापि भरून येणार नाही किंवा भरून येणे कठीण आहे. अशक्य आहे, मुष्कील आहे.

आमच्या 'धनश्री बँकेच्या' आनंदपूर शाखेतील ज्येष्ठ लिपिक कर्मचारी नारायण नामदेव नवले उर्फ नाना नवले पूर्ण साठ वर्षे सेवा करून जेव्हा अलिकडेच सेवानिवृत्त झाले व दुसऱ्या दिवसापासून बँकेतील त्यांच्या ठराविक खुर्चीवर बसून काम करण्याचा प्रयत्न करताना दिसेनासे झाले तेव्हा त्यांचे एक-एक बोल आणि किस्से आठवून आम्हा कर्मचाऱ्यांपैकी प्रत्येकजण अगदी सहजपणे नकळत हेच म्हणाला की , ''नाना नवलेंच्या सेवानिवृत्तीमुळे बँकेच्या या शाखेत निर्माण झालेली पोकळी भरून येणे कठीण आहे. मुश्किल आहे. अशक्यप्राय आहे. म्हणजे माणसाचे जागी माणूस येईल, परंतु नानांच्या नाना कळा पुन्हा बघता येणे. अनुभविता येणे कठीण आहे.''

याचा अर्थ असा नव्हे की, नाना नवले फार हुशार, कर्तबगार, कामात माहितगार होते. ते सामान्य बुद्धीचे व सांगकाम्या वृत्तीचे होते पण ते एक अजब व्यक्तिमत्त्व होते. कधी वेंधळे तर कधी बेरकी, कधी देवभोळे तर कधी एकदम व्यवहारी असे त्यांचे अनेक पैलू होते. कधी ते असा गोंधळ करून ठेवत किंवा कधी असे बोलत की आम्हाला कळत नसे हसावे की रडावे ? आता ते बँकेत रोज दिसत नसल्याने त्यांच्या गोंधळाच्या आणि मूर्खपणाच्या रम्य कथा आठवून आम्ही आमची करमणूक करून घेऊ लागलो व त्यांच्या अनुपस्थितीने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करू लागलो.

नाना नोकरीला लागले त्यावेळेस आजच्यासारखी बॉलपेन्स, पेन वापरली जायची नाहीत. दौत टाकाचा वापर करावा लागे. नानांच्या वेंधळेपणामुळे साहेब त्यांची कितीतरी वेळा बिनपाण्याने हजामत करीत असत. एकदा असेच एक रिटर्न (माहितीचा तक्ता) साहेबांनी संध्याकाळपर्यंत पूर्ण करण्यास सांगितले होते, पण नाना ते करण्याचे विसरले आणि घरी गेले. दुसऱ्या दिवशी साहेबांनी नानांची ते बँकेत येताच अशी उलटीसुलटी केली की, नाना थरथर कापायला लागले. अखेर साहेबांनी 'दुपारी १२ वाजण्याच्या आत जर ते रिटर्न तयार केले नाहीत तर तुमचे बारा वाजलेच म्हणून समजा असा सज्जड दम दिला. मग काय ? घामाघूम होऊन नाना साहेबांच्या केबिनमधून बाहेर आले. आम्ही त्यांचेवर नजर ठेवून होतो. ते त्यांच्या खुर्चीवर बसले व भांडेभर पाणी पिऊन त्यांनी मामा मोहिते शिपायाला बोलाविले. एक-एक रजिस्टर मागवून ते रिटर्न भरू लागले. आम्ही आमच्या कामात मग्न झालो. पण आमच्या पैकी जरा वात्रट असलेल्या विनायक वाकणकरचे सहज लक्ष नाना आणि मामांकडे गेले. आणि त्याला त्याचे हसू आवरेना. त्यामुळे आमचे सर्वांचेच लक्ष तिकडे गेले आणि आम्हीही मोकळेपणाने हसू लागलो. नाना आणि मामा आमचे हसणे ऐकून दचकले व आमच्याकडे बघू लागले. त्यांच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून विनायकने विचारले, ''नाना तुम्ही काय करताय ?''

''काय म्हणजे ? रिटर्न भरतोय.'' नाना म्हणाले.

''अहो पण कशाने भरताय ?'' विनायकने हसत हसत विचारले.

''कशाने भरतोय म्हणजे ?'' नाना

''अहो, म्हणजे शाईने की पेन्सिलने ?'' विनायकने मिस्कीलपणे विचारले.

''आँ ! अरेच्चा खरंच की !'' नाना एकदम घाबरून म्हणाले आणि मामावर खेकसू लागले. झालं होतं काय ? नाना रजिस्टर्स काढून आवश्यक ती माहिती पेन्सिलने रिटर्नमध्ये लिहित होते आणि मामा टिपकागदाने लिहिलेले टिपत होता.

असा वेंधळेपणा करणारे नाना कधी-कधी असं काही बोलत की, आम्हाला प्रश्न पडे. हेच ते वेंधळे नाना का ? एकदा काय झाले ? बँकेत बातमी आली की नानांची देखणी बायको त्यांना सोडून दुसऱ्या कुणाबरोबर तरी पळून गेली. नानांचा वेंधळेपणा, गबाळेपणा पाहून त्यांची बायको त्यांना सोडून जाणे अशक्य नव्हते. त्यामुळे ती बातमी आम्हाला ५०% खरी वाटली. नाना आपले नेहमीसारखे बँकेत आले. सर्वांनाच आश्चर्य वाटले पण त्यांना या बातमीबद्दल ''डायरेक्ट' कसे विचारायचे ? हा आम्हाला पडलेला प्रश्न मामा मोहितेने सोडविला. त्याने 'डेअरिंग' करून नानांना विचारले, ''नाना आम्ही सर्वांनी ऐकले ते खरं आहे का हो ?''

''माझ्या बायकोबद्दल ना ? हो, ते खरयं. आमचे शेजारी राहणाऱ्या श्यामराव सानेबरोबर ती कुठेतरी निघून गेली आहे पण खरं सांगू का ? त्या बदमाशाला जबरदस्त अद्दल घडवावयाची माझी तमन्ना त्यामुळे पुरी झाली आहे. त्या नटमोगरीच्या तावडीतून मी सुटलो आणि तो सापडला. बरं झालं. सुंठीवाचून खोकला गेला.''

आणि नाना खदखदून हसायला लागले. त्यांनी मामाला सर्वांसाठी चहा आणायला लावला. आम्हाला कळेना, नानांना वेड लागलंय की खरोखरच त्यांना बायको गेल्याचा आनंद झालाय. पण नानांचे हे एक रुप आम्ही पाहिले. नाना आपल्या संसाराबद्दल, खाजगी आयुष्याबद्दल कुणाशीही सहज बोलत असत. एकदा वर्ष अखेरीच्या कामामुळे नानांना जास्त वेळ थांबावे लागले. अखेर ते मामा मोहितेंना म्हणाले, ''मामा, दहा वाजले. आता मला घरी जायला हवे. बायको जेवणासाठी थांबली असेल. मामा आश्‍चर्यचकीत होऊन म्हणाले, ''नाना, जेवणासाठी नवऱ्याची वाट बघणारी बायको तुम्हाला मिळाली म्हणजे किती भाग्यवान आहात !''

नाना हसत म्हणाले, ''अरे, कसला भाग्यवान ? मी घरी जाणार. पीठ मळणार, चपात्या करणार, तोंडी लावणे करणार मग आम्ही दोघे जेवणार.''

नानांच्या हसण्यात मामांनीही भर टाकली. मग ते दोघे आपल्या घरी गेले. पण दुसऱ्या दिवशी जरा 'ऑफ मूड' ने नाना बँकेत आले. सगळे कर्मचारी एकमेकांकडे बघून, हातवारे करून, ''आज नानांना काय झाले ?'' असे विचारू लागले. बराच वेळ झाल्यावर मामाच पुढे झाले व नानांना म्हणाले, ''काय नाना, आज काय झाले ?'' तेव्हा नाना जरा वरच्या स्वरात म्हणाले, ''मामा वेगळे काय होणार? आमची धर्मपत्नी !''

''तिने काय केले ?'' मामांनी विचारले.

''मामा काल रात्री आपण किती उशीरा गेलो होतो की नाही ? पण मी घरात पाऊल टाकताच आमच्या बायकोची विविध भारती सुरू झाली. मी न बोलता जेवण्याची तयारी करू लागलो. तरी हिचे तोंड बंद होईना. कचकच चालूच. मी शेवटी चिडून म्हणालो, ''ए बाई, तुझी कचकच थांबव नाहीतर.....''

''नाहीतर काय ? मला माराल ? घराबाहेर काढाल ? मी सरळ माहेरी जाईन आणि घटस्फोटाची नोटीस पाठवून देईन.'' आमची बायको म्हणाली.

मी मग उपरोधिकपणे म्हणालो, ''उगाच माहेरी जाईन आणि घटस्फोटाची नोटीस पाठवीन असे सांगून मला खूष करण्याचा प्रयत्न करू नकोस, काय करायचे ते कर.''

पण हेच नाना कधीकधी इतके बावळट व्हायचे की आम्हाला त्यांची कीव यायची. एकदा ते एका लग्नासाठी नागपूरला गेले होते. ठरल्या दिवशी ते परत आले. पण इतके थकलेले आणि मरगळलेले दिसत होते की, आम्हाला वाटले ते नागपूर-पुणे चालत आले की काय ? नेहमीप्रमाणे वात्रट विनायकने नानांना हसत हसत विचारलेच. ''काय नाना, नागपूर-पुणे पदयात्रा केली की काय ? इतके दमलेले काय दिसताय ?''

''अरे ! काय सांगू ? रात्रीचा प्रवास म्हणून बर्थ रिझर्व्हेशन केलेले होते. पण वरचा बर्थ मिळाला. मला सवय नसल्याने झोप लागेना. त्यात समोरच्या बर्थवरचा माणूस इतका घोरत होता की बस्स !'' नानांनी टेबलावर कपाळ टेकवत सांगितले.

''अहो, नाना मग खालच्या बर्थवरच्या पॅसेंजरला विनंती करून बघायचं.'' विनायक म्हणाला.

''अरे, हे मला सुचलं नसेल का ?'' पण शेवटपर्यंत त्या बर्थवर झोपायला कुणी आलेच नाही. बर्थ खालीच होता.'' नानांनी आपली मजबूरी सांगितली. आम्ही नानांच्या या बावळटपणावर दिवसभर चर्चा करत हसत होतो.

नानांच्या बावळटपणाचा आणखी एक अफलातून किस्सा घडला. नाना पुणे ते हैद्राबाद रेल्वेने चालले होते. त्यांचे सेकंड क्लासचे तिकिट होते पण कोणत्याच सेकंड क्लासच्या डब्यात त्यांना आत शिरायलाही मिळाले नाही म्हणून ते फर्स्टक्लासमध्ये चढले व एका सीटवर बेधडक बसले. शेजारी बसलेल्या प्रवाशाने त्यांचे हातातील सेकंड क्लासचे तिकिट पाहून त्यांना सांगितले, ''हा फर्स्टक्लासचा डबा आहे. टी.सी. आला तर दंड वसूल करेल.'' नानांनी त्याकडे दुर्लक्ष केले. थोड्याच वेळात खरोखरच टी.सी. आला. नानांच्या शेजारच्या प्रवाशाने हैद्राबादी भाषेत टी.सी.ला काहीतरी नानांबद्दल सांगितले. टी.सी.ने एकवार नानांना आपादमस्तक न्याहाळले आणि हळूच नानांच्या कानात त्याने काही सांगितले. नाना लगेच उठले आणि सेकंड क्लासमध्ये कसेतरी चढले. इकडे फर्स्टक्लासमधील त्या प्रवाशाने टी.सी.ला विचारले की, असे तुम्ही नानांच्या कानात काय सांगितले की, त्यामुळे नाना लगेच निघून गेले ? टी.सी. हसून म्हणाला, ''मी त्यांना एवढेच सांगितले की, फर्स्टक्लासचा डबा हैद्राबादला जात नाही आणि ते लगेच उठले.'' ही हकीकत नानांनीच आपल्या तोंडाने आम्हाला सांगितली. आम्ही पोट धरून हसलो. पण नाना स्थितप्रज्ञासारखे काम करू लागले.

परमेश्‍वराची जशी अनंत रूपे असतात तशी नाना नवलेंचीही नाना रुपे आम्ही बघितली. एक दिवस बँक सुरू होताच साहेबांनी नानांना केबिनमध्ये बोलावले. जवळजवळ तासभर नाना केबिनमध्ये होते. आम्हाला वाटले साहेब आज नानांची दाढी हजामत दोन्ही करताहेत. बहुधा बिनपाण्याने. पण नाना पुन्हा आपल्या खुर्चीत बसताच मामाने त्यांना विचारलेच. ''नाना, एवढा वेळ साहेबांच्या केबिनमध्ये का लागला ?''

नाना मिशीत हसत म्हणाले, ''काही विशेष नाही रे. एखादा मुद्दा थोडक्यात कसा मांडावा हे साहेब समजावत होते !'' आम्ही त्यांच्या या वाक्याला हसून दाद दिली.

एक दिवस नानांच्या रुमालाला गाठ मारलेली बघून मामांनी त्यांना ''ही गाठ कसली ?'' असे हसत हसत विचारले.

नाना म्हणाले, ''अरे बायकोने मारली आहे गांठ''. तिचे पत्र पोस्टात टाकण्याची मला आठवण रहावी म्हणून.''

''मग. टाकलं की नाही पत्र पेटीत ?'' मामांनी विचारले.

''कसं टाकणार ? तीच मला पत्र द्यायचं विसरली'' आणि दोघेही मनमोकळेपणाने हसले.

एक दिवस नाना अर्धा तास उशीरा आले. साहेब गरम झाले होते. नानांची वाटच बघत होते. त्यांना आलेले बघताच त्यांच्यावर गरजले, ''नाना तुम्ही सिनियर आहात या बँकेत. तुम्ही असे उशीरा कसे येऊ शकता ? ज्युनिअर्स काय आदर्श ठेवतील ?''

''साहेब मी उशीरा बँकेत आलो त्याबद्दल मला माफ करा. पण याची भरपाई मी अर्धा तास संध्याकाळी लवकर घरी जाऊन करीन, प्रॉमिस'' नाना चटकन म्हणाले. संध्याकाळी मी अर्धा तास जास्त बसून भरपाई करेन असे त्यांना म्हणायचे होते पण बोलताना उलटं बोलले. आम्ही मात्र तोंडावर रुमाल धरून हसत होतो. उघडपणे हसणे शक्य नव्हते कारण साहेब गरम होऊन समोर उभे होते. साहेब केबिनमध्ये गेल्यावर तिकडे रागाने बघत नाना आम्हाला ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाले. ''या साहेबाच्या नानाची टांग.'' आम्ही आता मोकळेपणाने हसत राहिलो. त्यानंतर एक दिवस नाना साहेबांच्या केबिनमध्ये गेले आणि मोठ्या उत्साहाने साहेबांना विचारले, ''साहेब रेकॉर्ड रुममध्ये इतक्या फाईली आणि कागद पडले आहेत की पाय ठेवायला जागा नाही. तेव्हा आपण आज्ञा दिलीत तर जुने रेकॉर्ड मी जाळू इच्छितो.''

साहेबांनी जरा विचार केला व ते नानांना म्हणाले, ''नाना, तुमची सूचना योग्य आहे पण तुम्ही जाळणार असलेल्या प्रत्येक कागदपत्राची कॉपी काढून ठेवा मग जुने रेकॉर्ड जाळा.''

नानांना काही क्षण साहेब काय म्हणताहेत ते ध्यानात येईना. ध्यानात येताच मोठ्या मुश्किलीने हासू आवरीत ते केबिन बाहेर आले आणि हसतहसतच त्यांनी साहेबांचा सल्ला सर्वांना सांगितला. मग काय ? सारेजण न भूतो न भविष्यति हसायला लागले. कितीतरी वेळ हास्यकल्लोळ माजला.

नानांच्या सेवानिवृत्तीचे आधी सहा महिने तर ''ट्रॅजिडीतून कॉमेडी'' निर्माण व्हावी तसे झाले. म्हणजे झाले काय ? निवृत्तीपूर्वी वर्षभर आधी नाना आपला पूर्वीचा कोट, टोपी, धोतर, सदरा, तुटक्या चपला हा पेहराव बदलून पँट, त्यात इन् केलेला शर्ट, टाय, नवे पायमोजे, बूट असा पेहराव करू लागले होते. पण असा पोषाख वापरण्याची सवय नसल्याने दहा-दहा दिवस तोच पोषाख घालू लागले व मोजे तर इतके मळके असत की त्यांचा घाण वास यायचा. त्यांच्याजवळ जाताना प्रत्येक जण नाकाला रुमाल लावायचा. सगळ्यांनी कपडे, मोजे, वेळोवेळी धुवायला त्यांना सांगितले. पण काही उपयोग होत नव्हता. एक दिवस साहेबांनी त्यांना केबिनमध्ये बोलावून स्पष्ट शब्दात बजावले, ''नाना, उद्या हेड ऑफिसचे काही ज्येष्ठ अधिकारी या ऑफिसचे नूतनीकरणाचे संबंधात चर्चा करायला येणार आहेत. तेव्हा तुम्ही कपडे बदलून, मोजे बदलून या. नाहीतर तसेच परत जावे लागेल, समजलं ?''

नाना ''येस सर'' म्हणाले आणि केबिनबाहेर आले. दुसरे दिवशी नानांनी आज्ञाधारक मुलाप्रमाणे नवे कपडे घातले होते. मोजेही बदलले होते. त्यामुळे प्रथमदर्शनी साहेब खूष झाले. पण नाना जवळ येतात तो नेहमीचा घाण वास येऊ लागला. साहेब त्यावेळेस काही बोलले नाहीत. दिवस संपला. हेड ऑफिसचे लोक परत गेले. त्यानंतर साहेबांनी सर्वांच्या समोरच नानांना खडसावून विचारले, ''नाना, सगळे कपडे, मोजे नवे घालून हा वास कसा येतोय ?''

नाना चाचरत म्हणाले, ''साहेब घाण जास्त मोज्याची येत असेल म्हणून मी हे नवे मोजे घातले आहेत पण तुमची खात्री पटावी म्हणून जुने मोजेही पँटच्या खिशात घालून आणले आहे. ते पहा.'' जुने मोजे बाहेर काढताच सगळ्यांनी, ''शीऽऽ !'' म्हणत नाके रुमालाने दाबून धरली, चार-चार पावले मागे गेले.

नानांच्या ''सेंड ऑफ'' चे दिवशी वात्रट विनायकने नानांना विचारले, ''नाना उद्यापासून तुम्ही ऑफिसात नसलात तरी तुमची सतत आठवण आम्हाला येईल.'' नाना म्हणाले, ''मी निवृत्त झालो तरी रोज नेहमी सारखा बँकेत येणार आहे. कारण मला दुपारी घरी झोपायची सवय नाही.'' हे ऐकताच विनायकसकट सारे ''वा नाना, सिक्सर मारलीत हं'' असे म्हणत हसू लागले.

असे हे नामांकित नाना नवले गेल्याने - म्हणजे सेवानिवृत्त होऊन घरी गेल्याने आमच्या ऑफिसात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधी भरुन येईल असे तुम्हाला तरी वाटते का ? तुम्हीच सांगा.

**- पी. के. देवधर,**

३ आकाशदिप अपार्ट., सहकारनगर नं. २, पुणे ९ फोन २४२१०९९४

## राम आणि कृष्ण



माझ्या हृदयी नांदती राम आणि कृष्ण
कलीयुगी मी कुणा जागवू हाच पडे प्रश्न
रामाने पितृवचन पाळून दिले आप्तेष्टांना दुःख
कृष्णाने कंसवध करून निवारले स्वजनांचे दुःख
राम नाही हटला कधी शत्रुपुढूनी
कृष्ण प्रसिद्ध झाला रणछोडदास म्हणुनी
रामाने दिला जानकीला वनवास
कृष्णाने सुकर केला पांडवांचा वनवास
राम एकवचनी म्हणे सरळमार्ग बरवा
कृष्णाने सज्जन हितासाठी नाही केली नीतीअनीतीची पर्वा
रामाने वानरांना प्रेरणा दिली महान कार्य करण्या
कृष्णाने जगाला दिली गीता निष्काम कर्म करण्या
राम या जगी आदर्श राजा झाला
कृष्ण साऱ्या जगाचा प्रिय सखा झाला
तुम्हीच सांगा आता कोणाचा आदर्श घ्यावा

**- गजानन अराणके, पुणे**

लघुकथा

# बंधमुक्त

गावातल्या एसटी स्टँडवर उतरलो. मी व माझी पत्नी जरा इकडेतिकडे नजर टाकली. महादू उतरवून घेण्यास आलाच होता. आमचा पूर्वीपासूनचा गडी. आता जरा थकलेला.

'द्या ते सामान माझ्याकडे' - महादू.

'अरे असू दे. फार ओझे नाही. तिच्याजवळची तेवढी बॅग घे म्हणजे झाले.'

स्टँडपासून घर लांब नव्हते. मधल्या आळीतून आले, की अगदी हाकेच्या अंतरावर. वाटेत महादूकडे गावाबद्दल चौकशी केली. एकूण त्याच्या सांगण्यावरून गावात फारसा फरक पडला नव्हता. तेच अरुंद दगड, वर आलेले रस्ते. बोलत बोलत घराजवळ कधी आलो कळले नाही. क्षणभर दरवाजाकडे नजर टाकली. किती वर्षे घर सांभाळीत होता कोण जाणे. कुलूप काढले. एक दार आत ढकलले. एक विचित्र आवाज. दुसरे दार ढकलले. पुन्हा तसाच आवाज. कण्हल्यासारखा. जणू वेदनाच बोलक्या झाल्या असाव्यात.



आज घराचे कुलूप काढताना मनात विचार डोकावला. ज्या हातांनी घराला कुलूप लावून कुलपाच्या बेडीत बंदीवान केले त्याच हातांनी मी त्याला कित्येक वर्षांच्या सक्तमजुरीनंतर बंधमुक्त करीत होतो.

सरकारी खात्यात जवळजवळ एकूण चाळीस वर्षे नोकरी करून निवृत्त झालो. मुंबईतच नोकरीची सर्व वर्षे गेली. खाती बदलली एवढेच. मधूनमधून जसे जमेल तसे गावाकडील घराकडे येत असे. कधीकधी बऱ्याच वर्षात काही अडचणींमुळे फेरी होत नसे. दोन्ही मुले चांगली शिकली. आयुष्यात चांगली स्थिरावली. सुना चांगल्या मिळाल्या. नातवंडे खेळवली. निवृत्त झाल्यावर गावाकडेच घरी जायचा आम्ही दोघांनी निर्णय घेतला. मुलांचा, सुनांचा आग्रह मोडून हा निर्णय आम्ही घेतला होता. त्यात बदल होणार नव्हता.

घर जुनेच. दरवाजातून आत आल्यावर दोन्ही बाजूंना ओटे. तेथे भाताच्या कणगी भरून ठेवलेल्या असायच्या. पुढे आल्यावर मोठा चौक. चौकात मधोमध तुळशीवृंदावन. डाव्या बाजूला माडी. पलीकडे आमचेच जुने नाटकाचे थिएटर. उजव्या बाजूला दोन पायऱ्या चढल्या, की पडवी, नंतर ओटी, माजघर, स्वयंपाकघर. उजव्या कोपऱ्यात बाळंतिणीची अंधारी खोली, डाव्या बाजूस मोठे देवघर. स्वयंपाकघरातून दोन पायऱ्या उतरल्या की मोठी पडवी, दारापलीकडे थोडी मोकळी जागा. तेथेच मोठी चूल- आंघोळीचे पाणी तापविण्यासाठी. शेजारी मोठी दगडी. एकदा सकाळी दगडीत पाणी भरले की दिवसभर बघायला नको. परसात दोन धान्याची कोठारे. भाताचे पीक काढल्यावर कणगी भरून झाल्या, की भात या कोठारात साठवत असत. तेथेच एक बिटकी आंब्याचे झाड. घोसच्या घोस आंबे लगडायचे झाडाला. पहाटे झाडाखाली पिकलेल्या आंब्यांचा ढीग पडायचा प्राजक्ताच्या फुलासारखा. एके काळी बालगंधर्वांच्या नाटकांनी गाजविलेले नाट्यगृह आज विपन्नावस्थेत आहे. त्याच स्टेजवर आज नाट्यगृह कुत्र्यांचे भेसूर आवाज ऐकत आहे.

ओसरीवरच सामान ठेवले. महादूने थोडीशी साफसफाई केली होती. मागील दारी पाय धुऊन घेतले. महादूच्या कारभारणीने तांब्यात चहा करून आणला होता. तो घेतला. बरे वाटले. थकवा नाहीसा झाला. महादूबरोबर सर्व घर नजरेखालून घातले. तुळशीवृंदावनात तुळस नव्हती. वासे मोडकळीस आलेले. माजघरातील जिन्याने माडीवर गेलो. एके काळी माडीवर आंब्याच्या आढ्याच आढ्या पिकत होत्या, तिथे आता उंदरांचे साम्राज्य होते. लाकडे पार पोखरून टाकली होती. घराचा चेहरामोहराच बदलला होता. भकास वाटत होते. जणू सांगत होते, घरातील माणसे गेली म्हणून उंदरांना जवळ केले; पण तेच मला खायला निघाले. हे सर्व बघून अवाक झालो. आठवणींचे पत्ते समोरून सरकायला लागले.

एके काळचे आमचे हे घर नेहमी माणसांनी गजबजलेले असायचे.

वडील लहानपणीच गेले. आईला सख्खे कोणी नव्हते. चुलत आजोबांनीच आईचे सर्व केले. अपार माया होती त्यांची आईवर. आजोबांना मुलबाळ नव्हते. मूल होण्याची वाट पाहून आजी केव्हाच देवा घरी गेली होती. घरात आजोबांचे मावसभाऊ, मावशी त्यांच्या पाठोपाठच्या पाच मुली व एक मुलगा शेंडेफळ यांनाही आजोबांनीच सांभाळले होते. त्यांचा धान्य खरेदीचा व्यापार होता; शिवाय पेढीपण चालवत असत. मामा, घराच्याच जागेतील पोस्टात पोस्ट मास्तर म्हणून काम करीत असत. शेतकऱ्यांचा राबता नेहमी असायचा. जेवणाच्या पंक्तीला एक-दोन ब्राह्मण नेहमी असायचेच. शिवाय वार लावून जेवणारे विद्यार्थी, मुले होतीच. पंक्तीत 'हवं', 'नको' या शब्दांखेरीज कोणी काही बोलत नसे. आजोबांचा धाकच तसा होता. उन्हाळ्यात सकाळी नदीवर पोहायला जायचो. घरापासून दीड मैल अंतरावर नदी होती. शेताडीतून पायवाटेने आम्ही एकामागून एक ओळीत जात असू. आळीतील इतर मुलेमुली, बायकाही बरोबर असायच्या. पोहून आल्यावर मामींची न्याहारी तयार असायची. कधी मऊ भात, मेतकूट, कधी कांदा पोहे त्यावर पोह्याचा पापड, कधी नुसता आमटी भात व पापड असायचा. भरपूर भूक लागायची. मनसोक्त ताव मारायचो. दुपारच्या जेवणाला दीड वाजत असे.

घराच्या पुढे थोडे गेल्यावर आमराई आळीत जोशींचे घर होते. समोरच मोठी विहीर होती. धुणे-भांडी, आंघोळी, पाणी भरून घेण्यासाठी विहिरीवर नेहमीच आसपास राहणाऱ्या माणसा-बायकांची वर्दळ असायची. विहिरीच्या आसपास आंब्याची झाडे होती. आंब्याच्या हंगामात झाडावरील पाडाचे आंबे हेरून दगडाने पाडण्यात वेगळीच मजा असायची. असाच एकदा नेम धरून नेमका आंबा पाडला. दगड विहिरीवर पाणी भरणाऱ्या बाईच्या डोक्यावर पडला. मग आमराईतून मागील बाजूने धूम ठोकून थेट घर गाठले.

जोशींचा राम दरवर्षी मे महिन्यात विहिरीत पाण्याचा खडखडाट झाला, की एक दिवस दोरावरुन विहिरीत उतरायचा. विहिरीच्या मध्यापर्यंतच पायऱ्या होत्या. पाणी काढताना दोर सुटून विहिरीत पडलेल्या घागरी, बादल्या, हंडे तो वर काढत असे. त्याचा हा पराक्रम बघण्यास विहिरीकाठी आळीतील मुले, बायकापुरुष एकच गर्दी करीत असत. प्रत्येक जण आपापले भांडे ओळखून घेत असे. उरलेली भांडी तेथेच जमलेल्या गरीब लोकांना तो बक्षीस देत असे. राम याचा मोबदला काहीच घेत नसे. एक साहस, आवड म्हणूनच तो या गोष्टीकडे बघत असे. विहीर फार खोल असल्यामुळे दोरावरून वर येताना त्याची चांगलीच दमछाक होत असे. वर आल्यावर थोडा वेळ तो तसाच पडून राहायचा. मग कुणी तरी त्याला चहाकॉफी आणून देत असे.

त्याच रस्त्याने पुढे गेल्यावर एक मारुती मंदिर आहे. आवार तसे मोठे आहे. तेथे पहाटे आम्ही सूर्यनमस्कार घालायला जात असू. नमस्कारांची स्पर्धाही होत असे. संध्याकाळी तळ्याकाठच्या गणपती मंदिरात जाऊन गणपती दर्शन घेत असू. घरी आल्यावर सर्वजण हातपाय धुऊन परवचा म्हणायचो. तिन्ही सांजेला ओसरीवर दोन खुंट्यांना काठीने अडकविलेले कंदील खाली घेतले जाऊन लावले जात. नंतर देवाची आरती. देवघरातील त्या मोठ्या झांजा. त्यांच्या विशिष्ट आवाजाने जवळपासचा परिसर दणाणून जायचा. सर्व विश्वाला जागविणाऱ्या परमेश्वराला झांजा वाजवून जणू आम्ही जागे करीत असू. या सर्व आठवणींची शिवण कधी उसवली, कळले नाही.

महादूला विचारले, 'काय रे महादू त्या वरच्या आळीतील माधवराव भिडे काय म्हणतात ? ठीक आहेत ना'

महादू गप्प.

'काय रे तू गप्प का ? बोलत का नाहीस ?

'कसं सांगू ? त्यांनी गेल्याच वर्षी अवसेला जीव दिला.'

'अरे मला कोणाकडून तरी टपाल, निरोप धाडायचा ?'

'कस्य कळविणार ? आपलंही येणं झालं नाही गेल्या दोन-एक वर्षात.'

'खरं आहे तुझं, नाही जमलं मला.'

माधवराव म्हणजे एक नाट्यवेडा माणूस. 'राजसंन्यास', 'बेबंदशाही' नाटकात संभाजीची भूमिका करावी ती माधवरावांनीच. त्यांची देहयष्टी तशीच तगडी होती. अशा माणसाने विहिरीत उडी घेऊन जीव द्यावा ही घटना मनाला बऱ्याच यातना देऊन गेली.

मध्यंतरी मामांच्या सर्व मुलींची लग्ने झाली. त्या सासरी गेल्या. मुलाला नोकरी लागली. तोही बाहेर पडला. आजोबांचे, मामांचे निधन झालं. एकेक माणसे पडद्याआड गेली.

आजोबांनी आईवरील प्रेमाखातर घर माझ्या नावावर केले होते. आता आम्ही दोघे कायम इथे राहणार म्हणून महादू खूष होता. या घरातल्या सुखदु:खांचा तो एक साक्षीदार होता.

आज तुम्ही दमून आला आहात. स्वयंपाक करायचा नाही, असे महादूने बजावले होते. त्याने सुनेकडून झुणका-भाकर, भात आणि लाल ओल्या मिरच्यांचा खर्डा आणला होता. कासंडीत म्हशीचे दूधही त्याने तापवून आणले होते.

जेवण उरकले. महादूलाही पंक्तीस बसवले होते. गाठीला थोडा पैसा होता. हळुहळू एक-एक गोष्ट दुरूस्त केली. तुळशीवृंदावन सजवून तुळशीचे रोप लावले. घराला चांगला रंग दिला. लहान मुलांना आंघोळ घातल्यावर त्यांना तीट, पावडर, काजळ घालून छान-छान कपडे घालतात, तसेच आम्ही दोघे घर सजवत होतो. एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती घेत होतो.

फार पूर्वीपासूनच मुंबईच्या वातावरणाचा आम्हा दोघांना उबग आला होता. पण इलाज नव्हता. एकूण माणूस माणसाला विचारत नव्हता. घरे होती, पण त्यात माणसे नसायची. भोज्याला शिवण्यापुरतीच ती घरात येत असत. एरवी बहुतेक घरे कुलपाच्या बेडीत बंदिस्त असायची. आक्रोश करीत रहायची. अरे आम्हाला माणसे द्या. आक्रंदायची - आमचे घरपण टिकवा म्हणून त्यांचा हा आक्रोश. तो ऐकायला कुणाला वेळ कुठे असतो ? तेव्हाच ठरविले आता आपल्या घराकडे जायचे. आता मला कोणतेच बंधन नव्हते.

उतार वयातही एक अद्‌भुतसा उत्साह संचारला होता आम्हा दोघांतही. ठरवून टाकले, यंदाची दीपावली धूमधामपणे साजरी करायची. सर्वांना बोलवायचे. मुले, सुना, नातवंडे, घर कसे माणसांनी भरलेले दिसले पाहिजे. फटाके, फुलबाज्या, भुईनळे लावून घर आणि सारा परिसर उजळून टाकायचा. जल्लोष करायचा.

आज गावाहून आल्यावर घराचे कुलूप काढताना तोच विचार मनात डोकावला. ज्या हातांनी घराला कुलूप लावून कुलपाच्या बेडीत बंदिवान केले, त्याच हातांनी मी त्याला आज कित्येक वर्षांच्या सक्तमजुरीनंतर बंधमुक्त करीत होतो. डोळ्यात आनंदाश्रू चमकले, एक असीम समाधान लाभले. घराला खऱ्या अर्थाने माणसे मिळाली व माणसांना घर.

– **प्रभाकर गुपचूप**, पुणे ५१. दूरध्वनी - २४३४८३८९

## A funny Language

English is a funny language: the words are funny, the spellings are funny, the pronunciations are funny, even the meanings sometimes are funny. Having worked in the Bank for 39 years (speaking English, reading English, writing English, even thinking in English), I had accepted it as the most logical and natural language. It is only now, 25 years after retiring, that I am able to see the funny side.

This was brought home to me when I riffled through my scrap-book and came across the poem written by an exasperated Japanese student in "Reader's Digest" when he was stumped by the vagaries of English spellings/pronunciations. Here it is ; judge for yourself :-

The wind was ROUGH,
And cold and BLOUGH,
She kept her hands inside her MOUGH;
It chilled her THROUGH,
Her nose turned BLOUGH,
And still the wind faster FLOUGH;
And yet, ALTHOUGH
There was no SNOUGH,
The weather was a cruel FOUGH ;
It made her COUGH
(Please do not SCOUGH)
She coughed until her hat blew OUGH

******

On another plane are words known as HOMOPHONES – two or more words with different spellings and different meanings, but pronounced exactly similarly. Here are a few examples -

Wood and would
Bow and Bough
Sole and Soul

******

Some time back I had written a poem with several homophones, and it has been published in "The illustrated weekly"; here it is:-

Mothers of your taught their daughters,
"you NEED to KNEAD properly;
And when you SEW my dear, make it just so"
Alas, today's girls AIN'T orderly,
And since you REAP as you SOW the seed,
They are ELBOWED out
And are WEAK – KNEE'D.

* * * *

The Terms for collective nouns are equally funny. We all know of CROWD of people and HERD of buffaloes or sheep (sometimes used derogatively for dumb people!) You must have heard of FLOCK of geese and PRIDE of lions. But listen to these:-

A TRIBE of sparrows
A MUSTERING of storks
A PADDLING of ducks
A CONVOCATION of eagles
A COLONY of gulls
AN ARMY of frogs
A TROOP of kangaroos
A FLOCK of camels
A BARREN of mules
A CRASH of rhinos
A SCHOOL of fish
A SWARM of insects

********

Do you now hesitate to agree with me that English is indeed a funny language?

-P.S. Vaidya,
34 'Jayashree' 75, Worli Sea face, Mumbai 30.

## व्यक्ति विशेष एक चौफेर व्यक्तिमत्त्व
## सौ.जयश्री हेमंत शहा

**सौ.**जयश्री शहा प्रसन्न आनंदी व्यक्तिमत्त्व. तसं पाहिलं तर त्यांची ओळख ज्यांनी २००५ मध्ये नाशिक येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती नोंदविली असेल त्यांना झालेलीच आहे. त्यांनी केलेलं मुद्देसूद समर्पक भाष्य, सूत्रबद्ध संचलन, सर्वांनाच भावलं होतं.

मुंबई विद्यापीठातून एम.एससी. झाल्यावर त्यांनी वैज्ञानिक/संशोधक न होता, बँकेतील आकडेमोड करण्यात करिअर करणे पसंत केले. बँकेत काम करता करता विविध क्षेत्रातील व्यक्ति, संस्था यांच्याशी संपर्क ठेवून समाजसेवा, साहित्य, संस्कृति इ. विषयात त्यांनी रस घेतला. आजही नाशिकच्या कला, क्रीडा, सांस्कृतिक नाट्य क्षेत्रात त्यांचा संचार सुरू आहे.

दिंडोरी शाखेत हेड कॅशियर म्हणून कार्यरत असताना जोपूळ ह्या अतिशय लहान गावातील आश्रम शाळा दत्तक घेऊन विद्यार्थी/विद्यार्थिनींना मार्गदर्शन व संस्कार वर्ग चालवून आपली व बँकेची सामाजिक जबाबदारी पार पाडली.

२००1 मधील स्वेच्छानिवृत्ती काही त्यांना मिळाली नाही, पण लगेच २002 मध्ये वरिष्ठ सहकारी व हितचिंतक यांचा विरोध झुगारून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती मिळविली. आता सर्वस्वीपणे आपल्या आवडीच्या क्षेत्रात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आहे.

सौ.शहांना दिवसाचे २४ तास अपुरे आहेत असे वाटते, इतक्या विविध कार्यास त्यांनी स्वत:ला वाहून घेतले आहे. सामाजिक/सांस्कृतिक कार्यक्रमातील सक्रिय सहभागाबरोबरच इतरही अनेक उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत. त्यात योग साधना मार्गदर्शन, निवृत्तीनंतर सौ.शहांनी School of yoga, Munger (Bihar) येथील Applied yogic science या विषयाचे विशेष प्रशिक्षण पूर्ण केले व आता त्यांनी योग मार्गदर्शक म्हणून काम सुरू केले आहे. विविध गटातील नागरिकांसाठी ओंकार प्राणायम, ध्यान वर्ग घेण्याने त्यांच्या दिवसाची सुरूवात होते.

२००५ साली नासिक मध्ये ७८ वे साहित्य संमेलन झाले. ह्या सांस्कृतिक सोहळ्यात सौ.शहांकडे लहान मुलामुलींच्या साहित्य दिंड्यांच्या आयोजनाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ६ ते १२ वर्षांपर्यंत वयोगटातील मुलांकडून आखीव-रेखीव कार्यक्रम करवून घेणे म्हणजे तारेवरची कसरतच, पण संघटन-कौशल्य, अपार मेहनत व जिद्द या जोरावर त्यांनी ही जबाबदारी पार पाडली.

त्यांनी 'गर्भ-संस्कार' या अतिशय नाजूक विषयावर गर्भवती महिलांना मार्गदर्शन व प्रबोधन वर्ग सुरू केले आहेत. संतती सुसंस्कारित, निकोप प्रकृतीची असणे महत्त्वाचे आहे म्हणून असे वर्ग त्या नि:शुल्क व केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून चालवितात.

गायत्री परिवार ट्रस्ट नागपूर व विद्यार्थी परिषद, नागपूर यांच्या सहयोगाने एक राष्ट्रीय परिषद नोव्हे. २००६ मध्ये नागपूर येथे संपन्न झाली. परिषदेचा मुख्य विषय होता 'आरोग्य विज्ञान व अध्यात्म' (Health Science & Spirituality) ह्या परिषदेस अनेक मान्यवर देशभरातून भाग घेण्यास आले होते. सौ.शहा यांना दोन विषयांवर प्रबंध सादर करण्यास पाचारण करण्यात आले होते. सौ.शहा यांचे विषय होते -

१) गर्भसंस्कार व अध्यात्म Precious Pregnancy and Spirituality
२) ज्येष्ठांच्या जीवनातील योग व प्राणायाम यांचे महत्त्व Role of pranayam in the life of senior citizens.

सौ.शहा यांनी संधीचे सोने केले. विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी करून त्यांनी उपस्थित श्रोते व मान्यवर यांना प्रभावित केले. मुद्देसूद मांडणी, अभ्यासपूर्ण व सुसंगत स्पष्टीकरणाने त्यांचे दोनही प्रबंध परिपूर्ण होते, त्यासाठी सौ.शहा यांचा परिषदेने विशेष गौरव केला. वैद्यकीय शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नसूनही नाजूक व अवघड विषयांवर त्यांनी निबंध सादर केले. विषयाचा सखोल अभ्यास, मेहनत, जिद्द यांच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले.

त्यांचा नवीन काहीतरी करण्याचा ध्यास अजूनही संपला नाही. आता त्यांना उर्दू साहित्याने भुरळ घातली आहे. उर्दू वर्गात त्यांनी प्रवेश घेतला असून उर्दूच्या दोन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आहेत. नजिकच्या काळात असोसिएशनला सौ.शहा यांचे उर्दूत पत्र आल्यास नवल वाटू नये.

त्यांच्या सर्व कार्यास 'संवाद' परिवाराच्या हार्दिक शुभेच्छा !

– **श्री.वामन रा.बेळे,** नाशिक

## तू



तू करुणाकर – करुणासागर
करुणा दीनावर – दाविसी तू ।।१।।
अनाथांचा नाथ – करीसी सनाथ
जीवनाचा रथ – हाकसी तू ।।२।।
नरनारी पामर – भोग भोगती फार
नाही ते सुखद्वार – सांगसी तू ।।३।।
भक्तांचा आधार – प्रेम ते अपार
भक्तास्तव सत्वर – धावसी तू ।।४।।
विविध प्रकार – असती भूवर
त्यांचा कलाकार – अससी तू ।।५।।
विश्वाचा कारक – विश्वाचा तारक
विश्वाचा मारक – अससी तू ।।६।।

– **दत्तात्रय श्रीधर विद्वांस,** बदलापूर

Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004
SSPO Pune under Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date : 13/05/2004
Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37
on 25th of each Month

## अभिनंदनीय

एक उत्तम महत्त्व शिल्पकार, लेखक, संपादक, निर्देशक असा विविध पैलूंनी सोलापूरवासियांमध्ये एक वेगळेच स्थान निर्माण केलेले आपल्या असोसिएशनचे एक सदस्य श्री.शशिकांत लावणीस यांनी बंगलोरच्या 'इन्फोसिसच्या' अध्यक्षा, समाजसेविका, प्राध्यापिका ज्यांनी २०० कोटीहून जास्त रक्कम, गोरगरीबांचे (भारतीय) त्यांचे जीवनमान सुधारावे या एका उदात्त हेतूने दान म्हणून दिले, असे उदात्त व्यक्तिमत्त्व लाभलेल्या सुधा मूर्तींची भेट घेऊन त्यांच्याशी सुसंवाद साधला. या संबंधीच्या मुलाखतीच्या लेखाला काही प्रसार माध्यमांनी योग्य ती प्रसिद्धी दिली आहे. श्री.लावणीस यांचा हा एक प्रकारचा गौरव म्हणावा लागेल. भविष्यातील त्यांच्या उपक्रमात असोसिएशनतर्फे हार्दिक शुभेच्छा।

– सेक्रेटरी

## अभिनंदनीय

रंग स्टार ट्रस्ट विरार (मुंबई) यांचे तर्फे विरार येथे उखाणे स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत वसई तालुक्यातील १५० महिला स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत विरार येथील आपल्या असोसिएशनच्या एक सदस्य सौ.निर्मला अशोक चामलीकर यांनी सहभाग घेतला व स्पर्धकांनी घेतलेल्या प्रथम पारितोषिकाच्या (पैठणी) मानकरी ठरल्या. त्यांच्या या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन.

– सेक्रेटरी

## प्रतिक्रिया

'संवाद' च्या ऑक्टोबर २००७ च्या अंकातील 'संपादकीय' मनस्वीपूर्ण संपूर्ण उजाळा देणारे आहे. अंतर्गत गोष्टी प्रज्वलित झाल्यावर आयुष्यात आपल्याला दीर्घायुष्याला सर्वच दिवस आनंदाचे व भरभराटीचे जातील आणि एकत्र कुटुंबीयांचा सहवास-स्वतःच सुखी करून इतरांनाही आनंदीत करून जीवन जगण्यास काही गोष्ट आहे, याची उत्तम टिपणी केल्याबद्दल धन्यवाद।

– मधुकर पालकर, पुणे

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातींतील मजकुराची सत्यासत्यता वाचकांनी स्वतः पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ४ ते ५.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

| | |
|---|---|
| **If Undelivered Please Return to :**<br>**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**<br>**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141** | To, |

प्रकाशक : श्री. रा. ना. लाळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
संपादक मंडळ : सर्वश्री. वसंत धुमाळ, प्रभाकर गुपचुप, शरद शिरगावकर, श्रीधर सहस्रबुद्धे, फ्रांसिस आल्मेडा
मुखपृष्ठ व रेखाचित्रे : प्रभाकर गुपचूप. अंक सजावट, मांडणी व मुद्रित शोधन : फ्रांसिस आठवले, प्रभाकर गुपचूप
मुद्रक : संविधान इम्प्रेशन्स प्रा.लि., ४९/७६१ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे-३० फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ६२५४१३५९